# निशाणी ३५ खालील आदेश

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादींच्या म्हणण्यानुसार या कामी दावा मिळकतींची मोजणी झाली आहे. मोजणी अहवालानुसार प्रतिवादीने वादींच्या मिळकतीमध्ये ४ आर क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे दिसून येते. त्यामुळे, सदर ४ आर क्षेत्राचा कब्जा प्रतिवादीकडुन मिळावा अशी कथने दाव्यामध्ये नमूद करण्याकरीता वादींनी दुरुस्तीची परवानगी मागितली आहे.

३. प्रतिवादीतर्फे निशाणी क्र.३८ ला म्हणणे दाखल करण्यात आले. त्याने अर्जातील कथने नाकारली आहेत. त्याच्या म्हणण्यानुसार त्याने वादींच्या मिळकतीमध्ये कधीही अतिक्रमण केले नव्हते व नाही. वादींनी मोजणी अधिका—यांशी संगनमत साधून खोटया मोजणी नकाशाद्वारे प्रतिवादीने अतिक्रमण केल्याचे दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे, प्रतिवादीने हा अर्ज नामंजूर होण्याची मागणी केली आहे.

४. वादी व प्रतिवादीच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. निशाणी क्र.२९ सोबत दाखल करण्यात आलेल्या मोजणी नकाशावरुन प्रतिवादीने वादींच्या मालकीच्या ४ आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादींनी दाव्यामध्ये अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मागितला आहे. सदर मोजणी नकाशाद्वारे किती क्षेत्रामध्ये अतिक्रमण झाले आहे याचा खुलासा झाला आहे. त्यामुळे, जितक्या क्षेत्राचे अतिक्रमण झाले आहे,

तितक्याच क्षेत्राचा कब्जा मागण्याची दाद असणे अभिप्रेत आहे. नकाशावरुन प्रतिवादीने ४ आर क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे सकृतदर्शनी दिसते. त्याने अतिक्रमण केले आहे किंवा नाही अथवा नकाशा योग्य आहे की अयोग्य आहे या बाबी पुराव्याअंतिच स्पष्ट होणार आहेत. त्यामुळे, या बाबींचा विचार या क्षणी करण्याची आवश्यकता नाही. सकृतदर्शनी अहवालावरुन वादींनी मागितलेली दुरुस्ती मंजूर होणे न्यायोचीत वाटते. तसेच, या दुरुस्तीद्वारे दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होण्याची शक्यता वाटत नाही. या कामी मुद्दे निघाले असून अद्याप वादींनी पुराव्याचे शपथपत्र दाखल केले नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दावा दुरुस्तीची प्रत याकामी दाखल करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : पंढरपूर
दिनांक: ०१.०२.२०१४

( गि. सु. माने )
५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पंढरपूर.